**महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७ अ अन्वये आदेश**

---

९९२८ जा.क्र.सनिसा/अ/प्राधिकृत मंडळ /सिल्हवर एकर्स /१७
सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,सावंतवाडी
ता.सावंतवाडीजि.सिंधुदुर्ग
दि. १२/०९/२०१७

संदर्भ : १ ) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७७-अ अन्वये तरतूद
२) संस्था मंजूर उपविधी प्रमाणे कामकाज करीत नसल्याने
३) सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,सावंतवाडी यांचा दि ०८ /०९/२०१७ चा चौकशी अहवाल

ज्याअर्थी, सिल्हवर एकर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.निरवडे ता.सावंतवाडी ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग हि नोंदणी एसडीजी /एसडीआय/एचएसजी(टीसी) सन २०१६/ ३७१/ दिनांक २५/१०/२०१६ नुसार नोंदणीकृत सहकारी संस्था असून तीचे कामकाज महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम व संस्था पोटनियम यांना अनुसरुन असणे बंधनकारक आहे.

ज्याअर्थी, संस्थेच्या विद्यमान समिती सदस्यांचा एक वर्षांचा कार्यकाल दि.२४/०९/२०१७ रोजी संपत असून संस्थेने निवडणूक घेणे कामी आवश्यक कार्यवाही केलेली नाही.

संस्थेने नोंदणी पासूनचे लेखापरिक्षण करुन घेतलेले नाही.

चेंअरमन व सचिव यांनी राजीनामा दिलेला आहे.परतु त्याचे राजीनाम्याबाबत मासिक सभेमध्ये कोणताही निर्णय घेण्यात आलेला नाही.

संस्थेची नोदणी औक्टोबर २०१६ साली असून दरमहा मासिक सभा होणे आवश्यक असून दरमहा मासिक सभा झालेली नाही.

वार्षिक सर्वसाधारण सभा घेणेबाबत अदयापपर्यत कोणतीही कार्यवाही केलेली नाही.

कलम ७९ प्रमाणे ऑनलाईन रिर्टनची माहिती भरलेली नाही.

संस्थेने आय नमुना , जे नमुना ,शेअर्स रजिस्टर व इतर अनुषंगिक रजिस्टरे ठेवलेली नाहीत.

भाग प्रमाणपत्र अदा केलेली नाहीत.

संस्था संचालक मंडळ यांना संस्थेच्या कामकाजाबाबत आस्था असल्याचे दिसून येत नाही.

संस्थेचे कामकाज सहकारी कायदा व मंजूर उपविधी प्रमाणे झालेले दिसून येत नाही.

त्याअर्थी, संस्थेचे कामकाज पाहण्यासाठी श्री.डि.ए.खांडेकर सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था सावंतवाडी मुख्यप्रशासक,श्री.पी.एल.जाधव सहकारी अधिकारी श्रे.२,सदस्य व श्री.मधुकर प्रदिप महाडीक सदस्य, श्री.किशोर विनायक रांगणेकर सदस्य यांची प्रशासक मंडळ म्हणून नियुक्ति करणेबाबत पुढीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

## आदेश

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे क. ७७ अ (२) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी डि.ए.खांडेकर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, सावंतवाडी सिल्हवर एकर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.निरवडे ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग या संस्थेवर सिल्हवर एकर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.निरवडे,

१. श्री.डि.ए.खांडेकर सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था सावंतवाडी - मुख्यप्रशासक
२. श्री.पी.एल.जाधव सहकारी अधिकारी श्रे.२ - सदस्य
३. श्री.मधुकर प्रदिप महाडीक - सदस्य
४. श्री.किशोर विनायक रांगणेकर - सदस्य

वरील प्रमाणे प्राधिकृत मंडळ म्हणून नियुक्ति करीत आहे. प्राधिकृत मंडळ यांनी तात्काळ संस्थेचे व्यवस्थापन हाती घेवून सहा महिन्यांचे आत संस्थेचे कामकाज सुधारुन नवीन समिती कायदेशीररित्या निवडून येण्यासाठी कार्यवाही करावी व कामकाजाचा अहवाल सादर करावा.

हा आदेश माझी स्वाक्षरी व कार्यालयीन मुद्रा नोंद करुन आज दि.१२/९/२०१७ रोजी निर्गमित केला आहे.

(डि.ए.खांडेकर)
**सहाय्यक निबंधक,**
**सहकारी संस्था सावंतवाडी**

**प्रति,**

१ )माजी चेअरमन , सिल्हवर एकर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.निरवडे ता.सावंतवाडी जि.सिंधुदुर्ग

२ )सचिव, सिल्हवर एकर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.निरवडे ता.सातार्डा जि.सिंधुदुर्ग

३ ) श्री.डि.ए.खांडेकर सहाय्यक निबंधक,सहकारी संस्था सावंतवाडी मुख्यप्रशासक, सिल्हवर एकर्स सहकारी गृहनिर्माण संस्था मर्या.निरवडे ता.सावंतवाडी

२/- आपणांस सूचित करण्यात येत आहे की, सदर आदेशाची नोंद घेवून चार्ज देणे-घेणे याबाबत कार्यवाही करावी व तसा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**प्रत माहितीसाठी सादर :**

१ ) मुख्य कार्यकारी अधिकारी , सिंधुदुर्ग जिल्हा मध्य.सह. बँक लि.शाखा-मळेवाड

(डि.ए.खांडेकर)